# फ्लिपकार्टने सोनी एंटरनेटमेंट टेलिव्हिजनच्या शार्क टँक इंडिसोबत केली भागीदारी, देशात उद्योजकतेला चालना देण्याची आपली बांधिकली केली अधिक दृढ

*~ उद्योजकता आणि नाविन्यता हे गुण फ्लिपकार्टच्या डीएनएमध्येच आहेत*

*~ शार्क टँक इंडियाच्या या भागीदारीच्या माध्यमातून फ्लिपकार्टचा भारतभरातील इनोव्हेटर्सच्या पुढील पिढीला मार्गदर्शन करत 'स्टार्ट-अप इंडिया'ला पाठबळ देण्याचा उद्देश*

**बंगळुरु - १५ डिसेंबर २०२१:** भारतातील उद्योजकता परिसंस्थेला सक्रियपणे गती देण्याच्या मोहिमेला बळकटी देत फ्लिपकार्टने **शार्क टँक इंडिया** या सोनी एंटरटेनमेंटच्या आगामी शोसोबत भागीदारी करत असल्याची घोषणा आज केली. शार्क टँक हा जगभरात नावाजला गेलेला बिझनेस रिॲलिटी फॉरमॅट आहे. या शोने ४० हून अधिक देशांमध्ये (२००१ मध्ये सुरू झाल्यापासून) व्यवसायांचे पुनरुज्जीवन केले आहे आणि आता भारतातील या पहिल्या पर्वातून भारतीय स्टार्टअप परिसंस्थेलाही गती देण्याची शाश्वती त्यांना वाटते. शार्क टँक इंडियाच्या माध्यमातून व्यावसायिक कल्पना, बिझनेस प्रोटोटाइप्स किंवा सुरू असलेल्या व्यवसायांना गुंतवणुकीसंदर्भात तज्ज्ञ गुंतवणूकदार आणि व्यवसाय तज्ज्ञ (म्हणजेच शार्क) यांच्याकडून जोखले जाईल. स्टुडिओनेक्स्टची निर्मिती असलेला शार्क टँक इंडिया हा शो २० डिसेंबर रोजी सोनी एंटरटेनमेंटवर दर सोमवार ते शुक्रवार रात्री ९ वाजता पाहता येईल.

या भागीदारीचा भाग म्हणून अनेक फ्लिपकार्ट विक्रेत्यांनाही त्यांच्या व्यवसायाच्या कल्पना शार्क्ससमोर मांडता येणार आहेत. यातून त्यांना गुंतवणुकीच्या संभाव्य शक्यतांचा वेध घेता येईल. इतकेच नाही, शार्क टँक इंडियामधील अनेक सहभागींना (उद्योजकांना) त्यांची उप्तादने फ्लिपकार्ट या भारतातील एतद्देशीय ई-कॉमर्स बाजारपेठेत मांडता येतील आणि त्यामुळे त्यांना भारतातील लाखो ग्राहकांपर्यंत पोहोचता येईल.

मागील वर्षाने भारतातील लाखो लोकांचे आयुष्य बदलवून टाकले. अर्थव्यवस्थेतील सर्व क्षेत्रांवर हा परिणाम झाला आणि व्यवसाय करण्याच्या पद्धतीही यातून बदलल्या. देशातील स्थानिक एमएसएमई समुदायाला सक्षम करण्यावर फ्लिपकार्टने सातत्याने भर दिला आहे. यासाठी त्यांना अधिक डिजिटल करून त्यांच्या व्यावसायिक प्रवासातही बदल आणले जात आहेत. मागील वर्षात या मोहिमेचा या परिसंस्थेवर अधिक सखोल आणि लक्षणीय परिणाम दिसून आला. भारतभरातील एमएसएमईना त्यांचे कामकाज पुन्हा सुरू करण्यातील साह्य आणि रोजगार टिकवून ठेवण्यात ई-कॉमर्सने महत्त्वाची भूमिका बजावली.

या भागीदारीबद्दल **फ्लिपकार्ट ग्रूपचे चीफ कॉर्पोरेट अफेअर्स ऑफिसर रजनीश कुमार** म्हणाले, "*सोनी एंटरटेनमेंटच्या शार्क टँक इंडियासोबतची ही भागीदारी म्हणजे भारतातील उद्योजकतेला प्रोत्साहन देणे, त्यांना*

*उभे करणे आणि उद्यमशीलतेला खतपाणी घालणे या आमच्या उद्दिष्टाच्या दिशेने टाकलेले आणखी एक पाऊल आहे. देशातील विविध भागांमधील या अस्सल प्रतिभा असलेल्या उद्योजकांना त्यांचा व्यवसाय वाढवण्यासाठी एक व्यासपीठ देऊ करत या वेगाने वाढणाऱ्या परिसंस्थेच्या विकासात हातभार लावण्याची संधी आम्हाला मिळणार आहे. स्टार्टअप इंडियाला पाठबळ देण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग म्हणून उद्योजकतेला नवी उभारी देण्यात आमची ही भागीदारी महत्त्वाची ठरेल, असा आम्हाला विश्वास वाटतो."*

**सोनी पिक्चर्स नेटवर्क्स इंडियाच्या नेटवर्क चॅनल्सच्या ॲड सेल्सचे प्रमुख श्री. संदीप मेहरोत्रा** म्हणाले, "*हे शार्क टँक इंडियाचे पहिले पर्व आहे आणि फ्लिपकार्टसोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे. सहकार्याच्या माध्यमातून आपला सहभाग वाढवणाऱ्या नाविन्यपूर्ण पर्यायांचा मोकळेपणाने विचार करणाऱ्या समविचारी भागीदारांसोबत काम करताना आम्हाला आनंद होतोय. शार्क टँक इंडिया म्हणजे फक्त एक व्यासपीठ नाही तर ती एक संधी आहे... देशातील उद्योजकतेच्या मानसिकतेला अधिक नव्या उंचीवर घेऊन जाण्यात साह्य करणारी."*

**परिसंस्थेतील क्षमतांचा वेध घेण्यासंदर्भातील फ्लिपकार्टचा दृष्टिकोन**

*~ फ्लिपकार्ट सातत्याने या परिसंस्थेतील क्षमतांना समोर आणण्यासाठी तसेच स्थानिक उद्योजकता क्षेत्रात नाविन्यता, उत्सुकता आणि अपारंपरिक विचारांना चालना देणाऱ्या नव्या कल्पनांचा वेध घेण्याचा प्रयत्न करत आहे*

*~ मागील बहुतांश दशकांमध्ये फ्लिपकार्ट या परिसंस्थेतील एक सक्रिय गुंतवणूकदार राहिला आहे आणि आजघडीला १२ हून अधिक कंपन्यांमध्ये त्यांची मायनॉरिटी इन्व्हेस्टमेंट आहे*

*~ फ्लिपकार्ट लीप हा नव्या आणि उदयोन्मुख स्टार्टअप्सना वाढीसाठी, अडचणींवर मात करण्यासाठी आणि त्यातून भारतातील वाढत्या उद्योजकता परिसंस्थेत सहभागी होऊन 'स्टार्टअप इंडिया'ला बळकटी देण्यासाठी साह्य करणारा उपक्रम आहे.*

*~ फ्लिपकार्ट व्हेंचर्समधून डिजिटल स्टार्टअप्सना त्यांना अप्रतिम कल्पनांना प्रत्यक्षात आणण्यात आर्थिक साह्य केले जाते.*

*~ लीप आणि व्हेंचर्स उपक्रम एकमेकांना पुरक आहेत आणि नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाला बळकटी देण्याचे समान उद्दिष्ट यात राखण्यात आले आहे*

*~ 'फ्लिपकार्ट बुस्ट' हा नव्या युगातील डिजिटल-फर्स्ट कन्झ्युमर ब्रँड आहे, यातून प्रगतीचा नवा टप्पा गाठला जाईल. सर्विस फी मॉडेलच्या माध्यमातून फ्लिपकार्ट बुस्ट उदयोन्मुख मेड इन इंडिया ब्रँड्सना नियोजन, जाहिरात, कॅटलॉगिंग, लॉजिस्टिक, क्वॉलिटी कंट्रोल आणि मेंटॉरिंग अशा विविध स्तरावर अथपासून इतिपर्यंत साह्य करते.*

**About the Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, Flipkart Wholesale, Flipkart Health+ and Cleartrip. The Group is also a majority shareholder in PhonePe, one of the leading Payments Apps in India.

Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants, and small businesses to be a part of India's digital commerce revolution, with a registered customer base of more than 400 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem, and empower generations of entrepreneurs and MSMEs have inspired us to innovate on many industry firsts. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns – customer-centric innovations have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with its group companies, Flipkart is committed to transforming commerce in India through technology.

For more information, please write to **media@flipkart.com**